माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.३१९९/२२/अ.क्र.५८८४/२५/०१**

**श्री. विलास अनंत लाड**
१९, मिशन कंपाऊड, रुम नं. १६,
ऑगस्ट क्रांती मार्ग, नानाचौक,
मुंबई – ४०००७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (उद्यान कक्ष) सी व डी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड,नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड,नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक, सी व डी विभाग, श्री. अमित करंदीकर उपस्थित आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग अनुपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या दि. १९.०४.२०२२ मूळ माहिती अर्जान्वये "सेंट कोलंबो स्कुल कंपाऊड गार्डन मध्ये ड्रेबीज टाकुन गार्डन नष्ट करुन लादया लावण्याबाबत" संबंधित माहितीची मागणी केली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी "सदर ठिकाणी आपल्या अर्जात नमुद संस्थेची गव्हर्निंग बॉडीच्या ठराव व इतिवृत्ताची प्रत तसेक धर्मदाय आयुक्त यांचे ना हरकत प्रमाणपत्राची पत्र या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच ही बाब उद्यान खात्याच्या कार्यालयाशी संबंधित नाही. 2. सदर परिसरातिल प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने या कार्यलयामार्फत वृक्ष छाटणीची परवानगी दिली आहे. प्रत सोबत जोडली आहे. 3. सदर जागेची करनिर्धारण संकलक ज्या संस्थेच्या नावे आहे व ज्या सालापासुन आहे याबबतची माहिती करिता आपला माहिती अधिकार अर्ज सम क्रमांक व समदिनांक करनिर्धारण व कर संकलन खात्यास अग्रेषित करण्यात येत आहे", असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना माहिती देण्यात आली आहे. त्यावर अपीलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून

दि. १५.०६.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. सदर प्रथम अपील आदेशान्वये "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती अशंता पूर्तता करुन दिली आहे. इतर माहिती ज्या विषयाशी संबंधित आहे. त्या विभागाकडे सदर अर्ज अग्रेषित करण्यात आला आहे. सदर माहिती संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडून अपीलार्थी यांनी प्राप्त करावी". तथापि अपीलार्थी यांना झालेल्या वृक्ष तोड बाबत तक्रार अर्जावर दाद देत नसल्याने नमूद करुन प्रत्यक्ष कार्यवाहीची मागणी केली असून दि. १२.०८.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक पत्र पाठविण्यात आले असून सदर अर्ज हस्तांतरित केला आहे. तसेच इतर कोणतीही कार्यवाही केली नसून संबंधित कार्यवाहीची मागणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांच्या दि. १९.०४.२०२३ रोजीच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने उर्वरित माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशान्वये माहिती पाठविण्यात आली असून जन माहिती अधिकारी यांनी पत्तयावर मुद्या क्र. ३ बाबत करनिर्धारण व कर संकलन विभाग यांच्याशी संबंधित असल्याने सदर अर्ज करनिर्धारण व कर संकलन विभाग यांना माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम ६ (३) अन्वये हस्तांतरीत करण्यात आला आहे.

आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यासोबत आणलेला मागणी केलेला माहितीचा संच आयोगास सादर केला आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी, करनिर्धारण व कर संकलन विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात सेंट कोलंबो स्कुल कंपाऊड गार्डन मध्ये ड्रेबीज टाकुन गार्डन नष्ट करुन लादया लावण्याबाबतची माहिती अपीलार्थीस विनामुल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. या निर्देशासह सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०९.२०२५**

प्रत : १. जन माहिती अधिकारी, करनिर्धारण व कर संकलन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई - ४०० ००७. यांना योग्य त्या कार्यवाही प्रत अग्रेषित.